**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## विद्यापीठात 'कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ संदर्भातील अधिनियम-२०१३' विषयावर ३ डिसेंबरला कार्यशाळेचे आयोजन

## वुमेन्स स्टडीज सेंटरचा उपक्रम

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा वुमेन्स स्टडीज सेंटर आणि बहुजन हिताय सोसायटी, अमरावती यांचे संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय स्तरावर राबविण्यात येणाऱ्या 'स्त्रियांविरुद्ध हिंसाचाराचे समूळ उच्चाटन' अभियानाचे औचित्य साधून महाविद्यालये व विविध शासकीय विभागांमध्ये कार्यरत तक्रार समितीतील सदस्यांसाठी दि. ०३ डिसेंबर, २०१९ रोजी विद्यापीठ दृकश्राव्य सभागृहात 'कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ संदर्भातील अधिनियम - २०१३' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यशाळेच्या उद्घाटन सत्राला अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर, उद्घाटक म्हणून अमरावती विभागाचे पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके उपस्थित राहणार असून याप्रसंगी विषयतज्ज्ञ म्हणून पुणे येथील नारी समता मंचच्या कार्यकारी व्यवस्थापक तथा जेष्ठ स्त्रीवादी अभ्यासक प्रिती करमकरकर यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. समारोप सत्राला अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, तर प्रमुख अतिथी म्हणून ॲड. सोनाली क्षीरसागर उपस्थित राहतील.

सदर कार्यशाळेला विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये आणि असंघटित क्षेत्रात स्थापन करण्यात आलेल्या समितीतील किमान दोन सदस्यांना पाठवावयाचे असून त्यामध्ये एक स्त्री व एक पुरुष यांचा समावेश असणार आहे. तसेच नोंदणीकरीता सहभागींचे नाव, पदनाम, विभागाचे नाव, दूरध्वनी क्रमांक आदी माहिती दि. ३० नोव्हेंबर, २०१९ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत वुमेन्स स्टडीज सेंटरमधील वैभव अर्मळ यांचेकडे प्रत्यक्ष सादर करावयाची आहे. काही अडचण असल्यास त्यांचेशी दूरध्वनी क्रमांक ९६६५२५६५८४ यावर संपर्क साधावा, असे आवाहन वुमेन्स स्टडीज सेंटरच्या समन्वयक डॉ. वैशाली गुडधे व बहुजन हिताय सोसायटीच्या कार्यक्रम व्यवस्थापक सारिका वानखडे यांनी संबंधित विभागांना केले आहे.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै.............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. २५/११/२०१९.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

(डॉ. विलास नांदुरकर)
जनसंपर्क अधिकारी